# आदिवासी विद्यार्थ्यांच्या भाषा उच्चार समस्या व उपाययोजना यांचा अभ्यास

**डॉ. संतोष यादव कोळी**
आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र महाविद्यालय,
शिरपूर

***सारांश*** -

प्रस्तुत संशोधनात आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या प्रमाण भाषा उच्चाराच्या समस्या व त्यावरील उपाय-योजना यांचा अभ्यास करण्यात आला आहे. न्यादर्श म्हणून शिरपूर तालुक्यातील आदिवासी भागातील आश्रम शाळेतील इयत्ता ७ वीच्या वर्गातील ५० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. आदिवासी विद्यार्थ्यांच्या प्रमाण भाषेच्या उच्चार सुधारण्यासाठी भाषा उच्चार प्रशिक्षण वर्गाचे (प्रशिक्षण वर्गात - भाषा उच्चाराभ्यास साहित्य, ऑडिओ- व्हिडिओ साधने, भाषा प्रयोग शाळा या उपचार साधनांचा समावेश करण्यात आला होता.) आयोजन दररोज एक तास एका महिण्यासाठी करण्यात आले व त्याची परिणामकारकता तपासण्यासाठी प्रायोगिक पध्दती एकल गट पूर्वोत्तर प्रायोगिक गट अभिकल्पाची निवड केली. स्व-निर्मीत ३० गुणांची भाषा उच्चार चाचणीच्या सह्याने आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या प्रमाण भाषेच्या उच्चाराचे मूल्यमापन व गुणांकण करण्यात आले. संशोधन परिकल्पनाच्या सहाय्याने मिळालेल्या प्राप्त निष्कर्ष काढण्यात आले व त्यावर उपाय-योजना सुचविण्यात आल्यात.

**Key Words** - भाषा उच्चार प्रशिक्षण वर्ग, भाषा उच्चाराभ्यास साहित्य, ऑडिओ- व्हिडिओ साधने, भाषा प्रयोग शाळा

**प्रस्तावना** -

व्यक्तीने आपले आचार विचार व भावना प्रकट करण्यासाठी विकसित केलेली एक व्यवस्था म्हणजे भाषा होय. भाषेच्या माध्यमातून व्यक्ती हा समाज यांच्याशी जुळला जातो. भाषेच्या एका विशिष्ट उच्चारण पद्धतीमुळे ती संबंधित व्यक्ती कोणत्या प्रदेशातील आहे हे सुद्धा ओळखले जाते. भाषा ही मानवाला व व्यक्तीला समृद्ध करण्यासाठी एक अतिशय महत्त्वाची भूमिका बजावत आलेली आहे. भाषेच्या स्पष्ट उच्चारण शैलीमुळे व्यक्ती चे व्यक्तिमत्व हे प्रभावी पडून समाजात त व व्यवसायात मानाचे स्थान प्राप्त होते व त्याचा मानसिक व शैक्षणिक विकास देखील होत असतो.

आदिवासी भागातील जमाती ही त्यांच्या बोली भाषेचा प्रभाव हा इतर अन्य अर्जित केलेल्या भाषांवर देखील दिसून येत असतो त्यामुळे अर्जित केलेल्या भाषा यांचा उच्चार हा प्रमाणित दिसून येत नाही. त्यामुळे

आदिवासी भागातील विद्यार्थी हे वर्गात अथवा इतर समाजात मिसळताना अधिक बोलत नाहीत आणि बोलायचं झालं तर आपसात आपल्या आदिवासी बोलीभाषेत विचारांचे विनिमय करताना दिसून येतात. या कारणामुळे त्यांचा सामाजिक विकास हा कमी होऊन पर्यायाने त्यांच्या शैक्षणिक मानसिक व सामाजिक विकासावर होत असतो. या सर्व कारणांचा विचार करून आदिवासी भागातील विद्यार्थ्यांमध्ये अर्जित केलेल्या भाषेत उच्चार एक समस्या दिसून येते या समस्येवर उपाय योजना शोधून त्यावर कार्यवाही करणे हे या मागचे मुख्य उद्देश आहे.

महाराष्ट्रातील बोली भाषा आणि मराठी प्रमाणभाषा यात साम्यता असली तरी काही प्रमाणात त्यांच्यात काही प्रमाणात फरक हा आढळून येत असतो. भाषांमधील सर्वात मोठा फरक म्हणजे त्यांच्यातील उच्चार हा होय. भाषा उच्चार समस्या ही आदिवासी भागातील मुलांमध्ये फार मोठ्या प्रमाणात आढळून येत असते. आदिवासी भागात त्या भागातील बोली भाषा आणि मराठी प्रमाणभाषा ह्या दोन्ही भाषांचा उपयोग हा व्यवहारात केला जात असतो. शिक्षण हे प्रमाणभाषेत होत असल्याने आणि घरी नियमीतपणे स्वतःची बोली भाषेचाच उपयोग केला जात असल्याने आदिवासी भागातील मुलांमध्ये मराठी प्रमाणभाषा उच्चारण ही समस्या प्रामुख्याने निर्दशनास येत असते. हा उद्देश किंवा समस्या लक्षात मुलांमधील प्रमाणभाषा उच्चारण आणि त्यावरील उपाय-योजना यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. यासाठी संशोधिकाने या विषयावर संशोधन करण्याचे ठरविले.

**संशोधनाची गरज व महत्त्व -**

आदिवासी भागात प्रमाणभाषा ऐवजी बोली भाषेचाच उपयोग समाजात विचारंचे आदान-प्रदान करण्यासाठी केला जात असतो. मराठी भाषा ही केवळ शाळेत शिक्षण घेतांना ह्या भाषेचा उपयोग केला जातो. त्यामुळे आदिवासी भागातील मुलांमध्ये बोली भाषेचा प्रभाव हा अधिक प्रमाणात आढळून येत असतो. मराठी प्रमाणभाषेत बोली भाषेचा प्रभाव कमी करून प्रमाण भाषेची उच्चारण क्षमाता विकसीत करणे हा यामगचा शुध्द हेतू आहे. आदिवासी भागातील विद्यार्थ्यांमधील भाषा उच्चारण यात सुधारणा झाली तर त्यांच्यात आत्मविकास वृध्दिंगत होण्यास मदत होईल व त्यांची अध्ययन क्षमता देखील सुधारेल. यामुळे त्यांचा बौध्दिक व मानसिक विकास साधण्यास मदत होईल कारण विद्यार्थ्यांचा बौध्दिक व मानसिक विकास हा भाषेच्या विकासावर व उच्चारणावर अधिक अवलंबून असतो. याचबरोबर त्यांना प्रमाणभाषेवर देखील प्रभुत्व मिळविता येईल.

**संशोधनाचे शीर्षक** - आदिवासी विद्यार्थ्यांच्या भाषा उच्चार समस्या व उपाययोजना यांचा अभ्यास

**संशोधनाचे उद्दिष्टे -**

१. आदिवासी विद्यार्थ्यांच्या भाषा उच्चार समस्या या संदर्भात अभ्यास करणे.
२. आदिवासी विद्यार्थ्यांच्या भाषा उच्चार समस्या व त्यावरील उपाय-योजना शोधणे या संदर्भात अभ्यास करणे.
३. आदिवासी विद्यार्थ्यांच्या भाषा उच्चारण समस्या संदर्भात भाषा उच्चार प्रशिक्षण वर्गाची परिणामकारकता तपासणे.

**संशोधनाच्या परिकल्पना -**

१. आदिवासी भागातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या प्रमाण भाषा उच्चार प्रशिक्षण वर्गाचा प्रमाण भाषा उच्चारणात कोणताही परिणामकारक बदल आढळून येत नाही.
२. शाळेतील शैक्षणिक वातावरणाचा आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या प्रमाण भाषा उच्चारावर कोणताही परिणामकारक बदल आढळून येत नाही.
३. शिक्षकांचे भाषेवरील प्रभुत्व व अध्यापन पद्धतीचा आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या प्रमाण भाषा उच्चारावर कोणताही परिणामकारक बदल आढळून येत नाही.
४. भाषिक संसाधनांचा (ऑडिओ- व्हिडिओ साधने, भाषा प्रयोगशाळा, उच्चाराभ्यास साहित्य) उपयोग केल्याने आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या उच्चारावर कोणताही परिणामकारक बदल आढळून येत नाही.
५. शाळेतील कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा भाषिक सहभाग आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या प्रमाण भाषा उच्चारावर कोणताही परिणामकारक बदल आढळून येत नाही.

**संशोधन पध्दत -**

आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या भाषा उच्चारण समस्या जाणून घेण्यासाठी संशिधिकाने वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील सर्वेक्षण पद्धतीतील निरीक्षण तंत्राचा उपयोग करून विद्यार्थ्यांच्या प्रमुख भाषा उच्चारण समस्या यांचा अभ्यास केला व त्यावर उपायोजना शोधण्यासाठी भाषा उच्चारण सुधारण्यासाठी भाषा उच्चार प्रशिक्षण वर्गाचे आयोजन एका महिण्यासाठी केले. भाषा उच्चार प्रशिक्षण वर्गात विद्यार्थ्यांच्या भाषा उच्चार सुधारण्यासाठी - भाषा उच्चाराभ्यास साहित्य, ऑडिओ- व्हिडिओ साधने, भाषा प्रयोग शाळा या उपचार साधनांचा समावेश करण्यात आला. भाषा प्रशिक्षण वर्गाची परिणामकारकता तपासण्यासाठी प्रायोगिक पध्दती एकल गट पूर्वोत्तर प्रायोगिक गट अभिकल्पाची निवड केली. स्व-निर्मीत ३० गुणांची भाषा

उच्चार चाचणीच्या सह्याने आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या भाषा उच्चारणाची परिणामकारकता तपासून संशोधनाच्या निष्कर्षाच्या आधारे उपाय-योजना सुचविण्यात आल्या.

**संशोधनाची साधने -**

१. भाषा उच्चार प्रशिक्षण वर्ग
२. स्व-निर्मीत भाषा उच्चार चाचणी

**एकल गट पूर्वोत्तर प्रायोगिक अभिकल्प** - (Single Group pre-post Experimental Design)

| गट | पूर्व चाचणी | उपचार | उत्तर चाचणी |
|---|---|---|---|
| अ | $O_1$ | × | $O_2$ |

**संशोधन चल -**

१. स्वतंत्र्य चल - भाषा उच्चार प्रशिक्षण
२. आश्रीत चल - प्रमाण भाषा उच्चार

**न्यादर्श -**

संशोधन पधतीतील सहेतुक नमुना निवड पद्धतीने शिरपूर तालुक्यातील उच्च प्राथमिक स्तरावरील आदिवासी भागातील इयत्ता ७ वीच्या वर्गातील ५० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

**संख्याशास्त्रीय परिमाणे -**

संशोधनाच्या परिकल्पना तपासण्यासाठी तसेच त्यांचे विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यासाठी संशोधन पध्दतीतील मध्यमान, प्रमाणविचलन, 't' मूल्य या संख्याशास्त्रीय परिमाणांचा उपयोग करण्यात आला आहे.

**संशोधनाचे विश्लेषण व अर्थनिर्वचन -**

**परिकल्पना क्र. १** - आदिवासी भागातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या प्रमाण भाषा उच्चार प्रशिक्षण वर्गाचा प्रमाण भाषा उच्चारणात कोणताही परिणामकारक बदल आढळून येत नाही.

| चाचणी | नमुना | मध्यमान | स्वाधीनता मात्रा | प्रमाण विचलन | प्रमाण त्रुटी | प्राप्त टी मूल्य | नमुना टी मूल्य सार्थकता स्तर | | स्विकार / त्याग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पूर्व चाचणी | ५० | ३०.७० | ९८ | २.८५ | ०.५५ | ७.६४५ | ०.०५ | १.९८४ | त्याग |
| उत्तर चाचणी | ५० | ३४.९३ | | २.६८ | | | | | |

**विश्लेषण व अर्थर्वचन** -

परिकल्पना क्रमांक १ चे विश्लेषण व अर्थर्वचन केले असता ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना t मूल्य १.९८४ पेक्षा प्राप्त t मूल्य ७.६४५ नमुना t मूल्यापेक्षा अधिक असल्याने, सदरील परिकल्पनेचा त्याग करण्यात आला. आदिवासी भागातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या प्रमाण भाषा उच्चार प्रशिक्षण वर्गाचा प्रमाण भाषा उच्चारणात परिणामकारक बदल आढळून येतो.

**निष्कर्ष** -

आदिवासी भागातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या प्रमाण भाषा उच्चार प्रशिक्षण वर्गाचा प्रमाण भाषा उच्चारणात परिणामकारक बदल आढळून येतो.

**परिकल्पना क्र. २** -

शाळेतील शैक्षणिक वातावरणाचा आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या प्रमाण भाषा उच्चारावर कोणताही परिणामकारक बदल आढळून येत नाही.

| चाचणी | नमुना | मध्यमान | स्वाधीनता मात्रा | प्रमाण विचलन | प्रमाण त्रुटी | प्राप्त टी मूल्य | नमुना टी मूल्य सार्थकता स्तर | | स्विकार / त्याग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पूर्व चाचणी | ५० | ३०.१४ | ९८ | १.०७ | ०.३९ | १२.५३३ | ०.०५ | १.९८४ | त्याग |
| उत्तर चाचणी | ५० | ३५.१४ | | २.६१ | | | | | |

**विश्लेषण व अर्थर्वचन** -

परिकल्पना क्रमांक २ चे विश्लेषण व अर्थर्वचन केले असता ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना t मूल्य १.९८४ पेक्षा प्राप्त t मूल्य १२.५३३ नमुना t मूल्यापेक्षा अधिक असल्याने, सदरील परिकल्पनेचा त्याग करण्यात आला. शाळेतील शैक्षणिक वातावरणाचा आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या प्रमाण भाषा उच्चारावर परिणामकारक बदल आढळून येतो.

**निष्कर्ष** -

शाळेतील शैक्षणिक वातावरणाचा आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या प्रमाण भाषा उच्चारावर परिणामकारक बदल आढळून येतो.

**परिकल्पना क्र. ३** - शिक्षकांचे भाषेवरील प्रभुत्व व अध्यापन पद्धतीचा आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या प्रमाण भाषा उच्चारावर कोणताही परिणामकारक बदल आढळून येत नाही.

| चाचणी | नमुना | मध्यमान | स्वाधीनता मात्रा | प्रमाण विचलन | प्रमाण त्रुटी | प्राप्त टी मूल्य | नमुना टी मूल्य सार्थकता स्तर | | स्विकार / त्याग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पूर्व चाचणी | ५० | २९.३८ | ९८ | २.९२ | ०.५९ | १०.३०१ | ०.०५ | १.९८४ | त्याग |
| उत्तर चाचणी | ५० | ३४.५० | | ३.०२ | | | | | |

**विश्लेषण व अर्थवचन** -

परिकल्पना क्रमांक ३ चे विश्लेषण व अर्थवचन केले असता ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना t मूल्य १.९८४ पेक्षा प्राप्त t मूल्य १०.३०१ नमुना t मूल्यापेक्षा अधिक असल्याने, सदरील परिकल्पनेचा त्याग करण्यात आला. शिक्षकांचे भाषेवरील प्रभुत्व व अध्यापन पद्धतीचा आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या प्रमाण भाषा उच्चारावर परिणामकारक बदल आढळून येतो.

**निष्कर्ष** -

शिक्षकांचे भाषेवरील प्रभुत्व व अध्यापन पद्धतीचा आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या प्रमाण भाषा उच्चारावर परिणामकारक बदल आढळून येतो.

**परिकल्पना क्र. ४** -

भाषिक संसाधनांचा (ऑडिओ- व्हिडिओ साधने, भाषा प्रयोगशाळा, उच्चाराभ्यास साहित्य) उपयोग केल्याने आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या उच्चारावर कोणताही परिणामकारक बदल आढळून येत नाही.

| चाचणी | नमुना | मध्यमान | स्वाधीनता मात्रा | प्रमाण विचलन | प्रमाण त्रुटी | टी मूल्य | नमुना टी मूल्य सार्थकता स्तर | | स्विकार / त्याग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पूर्व चाचणी | ५० | ३०.५० | ९८ | ३.४२ | ०.५८ | ७.९४३ | ०.०५ | १.९८४ | त्याग |
| उत्तर चाचणी | ५० | ३५.१३ | | २.३० | | | | | |

**विश्लेषण व अर्थवचन** -

परिकल्पना क्रमांक ४ चे विश्लेषण व अर्थवचन केले असता ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना t मूल्य १.९८४ पेक्षा प्राप्त t मूल्य ७.९४३ नमुना t मूल्यापेक्षा अधिक असल्याने, सदरील परिकल्पनेचा त्याग करण्यात आला. भाषिक संसाधनांचा (ऑडिओ- व्हिडिओ साधने, भाषा प्रयोगशाळा, उच्चाराभ्यास साहित्य) उपयोग केल्याने आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या उच्चारावर परिणामकारक बदल आढळून येतो.

**निष्कर्ष** -

भाषिक संसाधनांचा (ऑडिओ- व्हिडिओ साधने, भाषा प्रयोगशाळा, उच्चाराभ्यास साहित्य) उपयोग केल्याने आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या उच्चारावर परिणामकारक बदल आढळून येतो.

**परिकल्पना क्र. ५** -

शाळेतील कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा भाषिक सहभाग आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या प्रमाण भाषा उच्चारावर कोणताही परिणामकारक बदल आढळून येत नाही.

| चाचणी | नमुना | मध्यमान | स्वाधीनता मात्रा | प्रमाण विचलन | प्रमाण त्रुटी | टी मूल्य | नमुना टी मूल्य सार्थकता स्तर | | स्विकार / त्याग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पूर्व चाचणी | ५० | ३३.०० | ९८ | २.३८ | ०.५७ | ३.४९६ | ०.०५ | १.९८४ | त्याग |
| उत्तर चाचणी | ५० | ३५.०० | | ३.२७ | | | | | |

**विश्लेषण व अर्थवचन** -

परिकल्पना क्रमांक ५ चे विश्लेषण व अर्थवचन केले असता ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना t मूल्य १.९८४ पेक्षा प्राप्त t मूल्य ३.४९६ नमुना t मूल्यापेक्षा अधिक असल्याने, सदरील परिकल्पनेचा त्याग करण्यात आला. शाळेतील कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा भाषिक सहभाग आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या प्रमाण भाषा उच्चारावर परिणामकारक बदल आढळून येतो.

**निष्कर्ष** -

शाळेतील कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा भाषिक सहभाग आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या प्रमाण भाषा उच्चारावर परिणामकारक बदल आढळून येतो.

**संशोधनाचे प्रमुख निष्कर्ष -**

- आदिवासी भागातील विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या प्रमाण भाषा उच्चार प्रशिक्षण वर्गाचा प्रमाण भाषा उच्चारणात परिणामकारक बदल आढळून येतो.
- शाळेतील शैक्षणिक वातावरणाचा आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या प्रमाण भाषा उच्चारावर परिणामकारक बदल आढळून येतो.
- शिक्षकांचे भाषेवरील प्रभुत्व व अध्यापन पद्धतीचा आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या प्रमाण भाषा उच्चारावर परिणामकारक बदल आढळून येतो.
- भाषिक संसाधनांचा (ऑडिओ- व्हिडिओ साधने, भाषा प्रयोगशाळा, उच्चाराभ्यास साहित्य) उपयोग केल्याने आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या उच्चारावर परिणामकारक बदल आढळून येतो.
- शाळेतील कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा भाषिक सहभाग आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या प्रमाण भाषा उच्चारावर परिणामकारक बदल आढळून येतो.

**संशोधनाच्या प्रमुख उपाय-योजना / शिफारशी -**

१. भाषा उच्चार प्रशिक्षण वर्गांचे विस्तारीकरण करणे - आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या भाषिक प्रगतीसाठी शाळांमध्ये नियमित *उच्चार प्रशिक्षण वर्ग* आयोजित करावेत. तसेच विद्यार्थ्यांच्या आवश्कतेनुसार प्रशिक्षण कार्यक्रम राबवावेत.

२. भाषिक दृष्ट्या शैक्षणिक वातावरण समृद्ध करणे - आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या भाषिक प्रगतीसाठी शाळांमध्ये भाषिक वातावरण निर्मिती करणे व *योग्य बोलण्याच्या सवयी, शुद्ध उच्चाराचे नमुने, भाषिक उपक्रम* व *वाचन–ऐकण क्रियाकलाप* वाढविण्यावर भर देण्यात यावा.

३. शिक्षकांचे प्रशिक्षण व भाषिक प्रभुत्व वाढवावे - आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या भाषिक प्रगतीसाठी आदिवासी भागात अध्यापन करणाऱ्या शिक्षकांना *उच्चारशास्त्र, ध्वनीशास्त्र, बहुभाषिक अध्यापन* यासंबंधी कार्यशाळा व प्रशिक्षण देण्यात यावे व शिक्षकांनी स्वतःचा भाषिक उच्चार शुद्ध ठेवण्यावर लक्ष केंद्रीत करावे.

४. भाषिक संसाधनांचा प्रभावी वापर करणे - आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या भाषिक प्रगतीसाठी शाळांमध्ये ऑडिओ–व्हिडिओ साधने, भाषा प्रयोगशाळा, उच्चाराभ्यास साहित्य, भाषा-कार्यप्रणाली (Apps) यांचा उपयोग करणे. तसेच शाळा सुटल्यावर घरीही विद्यार्थ्यांना अशा साधनांचा वापर करण्यास प्रोत्साहित करावे.

५. भाषिक उच्चारणासंबंधी सक्षम करणे - आदिवासी भागातील विद्यार्थ्यांच्या भाषिक प्रगतीसाठी पालकांना भाषा महत्त्व, योग्य बोलण्याची पद्धत, आणि वाचन संस्कृती याबद्दल मार्गदर्शन करावे.

**संदर्भ ग्रंथ सूची** -


- देशमुख, सुनील. (२०१४). *भाषा, बोली आणि समाज.* पुणे: डायमंड पब्लिकेशन.
- बोबडे, शंकर. (२०१७). *आदिवासी शिक्षणाचे प्रश्न आणि धोरणे.* नागपूर: संकल्प प्रकाशन.
- जाधव, संजय. (२०१८). *मराठी उच्चारशास्त्र.* पुणे: मौज प्रकाशन.
- पवार, मीनाक्षी. (२०२०). *आदिवासी विद्यार्थ्यांच्या भाषिक समस्यांचा अभ्यास.* मुंबई: भारतीय विद्या संशोधन केंद्र.
- राज्य भाषा संस्थान. (२०१६). *मराठी ध्वनिशास्त्र आणि उच्चार.* मुंबई: महाराष्ट्र शासन.
- एक्का, रमेश. (२०१५). *आदिवासी बच्चों की भाषा समस्याएँ.* भोपाल: मध्य प्रदेश हिन्दी ग्रंथ अकादमी.
- सिंह, रमेश. (२०१२). *शिक्षा में भाषाई बाधाएँ.* नई दिल्ली: भारतीय शिक्षण मंडल.
- दूबे, रजनीकांत. (२०१९). *मातृभाषा और शिक्षा.* नई दिल्ली: एनसीईआरटी.
- महाराष्ट्र राज्य आदिवासी विकास विभाग. (२०२०). *आदिवासी शिक्षण स्थिती अहवाल.* मुंबई.
- NCERT. (२०१४). *Learning through Mother Tongue in Tribal Areas.* नवी दिल्ली.
- भारत सरकार. (२०२०). *राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० (भाषा अध्यापन विभाग).* नवी दिल्ली.